असा. क्र. १४०

रजिस्टर्ड नं.एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

सोमवार, जुलै ९, २००७/आषाढ १८, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## पर्यावरण विभाग

नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जुलै २००७

## अधिसूचना

**महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६.**

क्रमांक प्लास्टीक. २००५/प्र.क्र. ३८/ता.क. ३.—महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ (२००६ चा महा. १०) याच्या कलम १८ चे पोट-कलम (३) आणि कलम ४ च्या पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कलम १८ च्या पोट-कलम (२) नुसार आवश्यक असल्याने सर्व संभाव्य बाधित व्यक्तींच्या माहितीसाठी व याद्वारे सूचित करण्यात येते की, हे उक्त प्रारूप नियम महाराष्ट्र शासन २५ जुलै २००७ या वा त्यानंतर विचारार्थ घेईल.

२. उक्त दिनांकापूर्वी प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त झालेल्या सूचना वा आक्षेप यांचा शासनामार्फत विचार करण्यात येईल.

**प्रारुप नियम**

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना, महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज्) (उत्पादन व वापर) (सुधारणा) नियम, २००७ असे म्हणावे.



[ किंमत : ३.०० रुपये ]

२. महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज्) (उत्पादन व वापर) नियम, २००६ मधील नियम ३ खालीलप्रमाणे बदलण्यात येत आहे :—

" ३. **अंमलबजावणी प्राधिकरण.**—महानगरपालिका आयुक्त किंवा महानगरपालिका आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव किंवा मंडळाने नामनिर्देशित केलेला उप प्रादेशिक अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अन्य कोणताही अधिकारी, राज्याच्या उद्योग विभागाचे विकास आयुक्त (उद्योग) किंवा विकास आयुक्त (उद्योग) यांनी नामनिर्देशित केलेला उप संचालकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अन्य कोणताही अधिकारी, संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी; किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेल्या तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अन्य कोणताही अधिकारी; आणि नगरपालिकांचे मुख्य अधिकारी हे या नियमांतील तरतुदींची त्यांच्याशी संबंधित क्षेत्रात अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असतील. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शर्वरी गोखले**

शासनाच्या प्रधान सचिव.

## ENVIRONMENT DEPARTMENT

15th Floor, New Administrative Building, Opp. Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th July 2007

*NOTIFICATION*

MAHARASHTRA NON-BIODEGRADABLE GARBAGE (CONTROL) ACT, 2006.

No. Plastic. 2005/CR-38/T.C. 3—The followig draft of rules to amend the Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture and usage) Rules 2006, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause *(i)* of sub-section *(3)* of section 18 read with sub-section *(1)* and *(2)* of Section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006 (Mah. X of 2006), is hereby published as required by sub-section *(2)* of the said section 18, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 25th day of July 2007.

2. Any objection or suggestion which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Environment Department, Mantralaya, Mumbai 400 032, before the aforesaid date, will be considered by Government.

*DRAFT RULES*

1. *Short Title.*—These rules may be called the Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture and Usage) (Amendment) Rules, 2007.

2. In the Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture and Usage) Rules, 2006, for rule 3, the following rule shall be substituted, namely :—

"3. *Enforcing Authority.*— The Municipal Commissioner or any other officer nominated by the Municipal Commissioner ; the Member Secretary of the State Pollution Control Board or any other officer not below the rank of Sub-Regional Officer, nominated by the Board; the Development Commissioner (Industries) of the Industries Department of the State or any other officer not below the rank of the Deputy Director, nominated by the Development Commissioner ; the Collector of the District or any other officer not below the rank of the Tahasildar nominated by the Collector for his distirct ; and the Chief Officer of the Municipal Councils shall be the authorities competent for enforcement of the provisions of these rules, within their respective jurisdiction. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHARWAREE GOKHALE,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई